# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक ०८/०६/२०१८**

## १ ) वाळु चोरी

**अ) धर्माबाद :-** दिनांक ०६.०६.२०१८ रोजीचे १५.०० वा. चे सुमारास मौ.चौंडी गोदावरी नदी पात्र, ता.धर्माबाद जि.नांदेड येथे यातील आरोपीतांनी संगनमत करुन विनापरवाना बेकायदेशिररित्या आपले ताब्यातील ५ ट्रॅक्टर ट्रॉलीसह अंदाजे किंमत १४,७०,०००/- रुपये व प्रत्येक ट्रक्टर मध्ये एक ब्रास रेती अंदाजे किंमती २,०००/- रुपये प्रमाणे असे ५ ब्रास रेतीची किंमत १०,०००/- रुपये असा एकुण १४,८०,०००/- रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतुक करित असतांना मिळुन आले, वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/१६८३ शेख आयुब शेख ईमाम साब, ने.पो.स्टे.धर्माबाद** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.धर्माबाद** गुरनं १२७/२०१८ कलम ३७९ , ३४ भादवी कायदयाप्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/जायभाये, मो.नं. ०२४६५-२४४१३३** हे करीत आहेत.

**ब) धर्माबाद :-** दिनांक ०५.०६.२०१८ रोजीचे १७.०० वा. चे सुमारास जारीकोट रोडवर, ता.धर्माबाद जि.नांदेड येथे यातील आरोपीतांनी संगनमत करुन विनापरवाना बेकायदेशिररित्या आपले ताब्यातील १ ट्रॅक्टर क्रमांक ए.पी.२६/यु.३९१४ ट्रॉलीसह अंदाजे किंमत ३,१०,०००/- रुपये व एक ब्रास रेती अंदाजे किंमती २,०००/- रुपये असा एकुण ३,१२,०००/- रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतुक करित असतांना मिळुन आले, वगैरे **फिर्यादी सपोउपनि/कल्याण किशनराव मांगुळकर, ने.पो.स्टे.धर्माबाद** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.धर्माबाद** गुरनं १२८/२०१८ कलम ३७९ , ३४ भादवी कायदयाप्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/जायभाये, मो.नं. ०२४६५-२४४१३३** हे करीत आहेत.

## २)मो.सा.चोरी :-

**वजिराबाद :-** दिनांक ०६.०६.२०१८ चे २२.०० ते दि.०७.०६.२०१८ चे ०९.०० वा.चे दरम्यान गित्ते वाडा सोमेश कॉलनी चे रोडवर, नांदेड येथे यातील फिर्यादी हा त्याची होन्डा युनिकॉन कंपनीची मो.सा.क्रमांक एम.एच.२६/बी.एफ.६९०७ जुनी वापरती अंदाजे किंमत ६०,०००/- रुपयाची नमुद ठिकाणी लावली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी गजानन पि.रामा कांबळे, वय २४ वर्षे व्यवसाय नोकरी रा.सोमेश कॉलनी, नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.वजिराबाद** गुरनं १२६/२०१८ कलम ३७९, भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/७९ राठोड, मो.क्र. ९९२११२३५५७९** हे करीत आहेत.

## ३) हयगयीने वाहन चालवुन मरणास कारणीभुत (अपघात) :-

**उस्मानगर :-** दिनांक ०५.०६.२०१८ रोजी चे २०.०० ते २०.३० वा. चे सुमारास, नांदेड ते मारतळा जाणारे रोडवर, ता.लोहा जि.नांदेड येथे यातील **मयत नामे मारोती विश्वांभर उबाळे, वय २१ वर्ष रा.मारतळा, ता.लोहा जि.नांदेड** हा त्याचे ताब्यातील मो.सा.क्रमांक एम.एच.२६/बी.जी.९२५९ वर बसुन नांदेड ते मारतळा रोडने जात असतांना मामासाहेब महाराजांचे समाधी समोरील हायवे रोडचे उतारावर आपली मो.सा. हयगय व निष्काळजीपणे भरवेगात चालवल्याने त्यास गंभीर मार लागल्याने उपचारकामी स.द.विष्णुपुरी येथे शरीक केले असता उपचारा दरम्यान मरण पावला. वगैरे **फिर्यादी पांडुरंग पि.विश्वांभर उबाळे, वय २० वर्षे व्यवसाय मजुरी, रा.मारतळा,ता.लोहा जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो.स्टे.उस्माननगर** गुरन ७८/२०१८ कलम ३०४ (अ), २७९, भादंवि कायद्या प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/२२७६ गजभारे, मो.नं. ०२४६६-२६२२३३** हे करीत आहेत.

## ४) बेकायदेशिररित्या देशी दारु बाळगुन मिळुन आला :-

**हदगाव :-** दिनांक ०७.०६.२०१८ चे १८.४५ वा सुमारास, बोरगाव जाणारे रोडवर, ता.हदगाव जि.नांदेड यातील नमुद आरोपीने विना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्र्याचे १८० एम.एल.च्या २३ सीलबंद बॉटल किंमत अंदाजे १,१९६ /- रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याच्या उददेश्याने ताब्यात बाळगतांना मिळुन आला. वैगेरे **फिर्यादी पोहकॉ/१५६९ बालाजी शंकरराव कदम, ने.पो.स्टे.हदगाव** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.हदगाव** गुरन ११४/२०१८ कलम ६५ (ई) मुप्रोका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/८३६ चव्हाण, मो.क्र.०२४६८-२२२३३३** हे करीत आहेत.

## ५) तिर्रट नावाचा जुगार :-

**अ) देगलुर :-** दिनांक ०७.०६.२०१८ रोजी चे १६.४५ वा. चे सुमारास, मौ.करडखेड शिवार, ता.देगलुर जि.नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या लोकांकडुन पैसे घेवुन तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असताना नगदी ३,५७०/- रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/११९८ मोहन सुरेशराव कंधारे, ने.पो.स्टे.देगलुर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.देगलुर** गुरन. २१४/२०१८ कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोना/११९८ मोहन सुरेशराव कंधारे, मो.क्र. ८८५६०८००२५** हे करीत आहेत.

**ब) देगलुर :-** दिनांक ०७.०६.२०१८ रोजी चे २०.१० वा. चे सुमारास, मौ.सुगाव ग्रामपंचायत समोर, ता.देगलुर जि.नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या लोकांकडुन पैसे घेवुन तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असताना नगदी ५,८००/- रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/ज्ञानोबा शिवाजी काळे, ने.पो.स्टे.देगलुर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.देगलुर** गुरन. २१५/२०१८ कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोना/११९८ मोहन सुरेशराव कंधारे, मो.क्र. ८८५६०८००२५** हे करीत आहेत.

## ६) विषारी औषध पिऊन मृत्यु :-

**भोकर :-** दिनांक ०७.०६.२०१८ रोजी चे १५.०० वा. चे सुमारास सरकारी दवाखाना भोकर, जि.नांदेड येथे, यातील **मयत नामे सिताराम नारायण तांदळवाड, वय ३० वर्षे रा.थेरबन, ता.भोकर जि.नांदेड** हा कोणत्यातरी कारणावरुन कोणतेतरी विषारी औषध पिल्याने त्यास उपचार कामी सरकारी दवाखाना भोकर येथे शरीक केले असता उपचारा दरम्यान मरण पावला. वगैरे **खबर देणार एस.एम.पोहरे, व्यवसाय वैद्यकीय अधिकारी स.द.भोकर, जि.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.भोकर** आ.मृ. २८/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास पोहेकॉ/८२३ आत्राम, मो.क्र.९४२०२०१५०५** हे करीत आहेत.


**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४

# प्रेस नोट

महाराष्ट्र राज्य पोलीस दलात राबविण्यात येणाऱ्या पोलीस कल्याण योजनेबाबत जागरुकता निर्माण होण्याकरीता नांदेड पोलीस दलात १ जुन २०१८ ते ०७ जुन २०१८ चे दरम्यान पोलीस कल्याण सप्ताह साजरा करण्यात आला. त्या मध्ये दिनांक ०७.०६.२०१८ रोजी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या पाल्याकरीता १० वी, व १२ वी, व युपीएसी, एम.पी.एस. सी. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन मेळावा साजरा करण्यात आला. त्यामुध्ये प्रा.दिगांबर भास्कर जोशी, प्रा.विकास सुकाळे, प्रा.एकनाथ पाटील, प्रा.बालाजी कोकडवार, प्रा.सारडा यांनी मुलाना मार्गदर्शन केले आहे. त्याच प्रमाणे पोलीस कल्याण सप्ताहाचा समारोप स्नेहनगर पोलीस कॉलनी येथे पार पाडला. सप्ताह दरम्यान घेण्यात आलेल्या विवीध स्पर्धेतील विजेत्याना श्री.व्हि.पी.नांदेडकर, पोलीस उप अधीक्षक (मु), नांदेड यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. तसेच पोलीस कल्याण सप्ताहात पोलीस कल्याण योजनेची अद्यावत माहिती असलेली पुस्तिका तयार करुन त्याचे सर्व पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांना व कुंटूंबाना वाटप करण्यात आले. तसेच पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांना व कुंटूंबाना श्री.व्हि.पी. नांदेडकर, पोलीस उप अधीक्षक (मु), नांदेड पोलीस कल्याण संबंधाने मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे प्रस्तावीक व आभार प्रदर्शन सपोनि श्री. आर.के.मुंडे, पोलीस कल्याण नांदेड यांनी केले.






(आर. के. मुंडे),
सहा. पोलीस निरीक्षक,
पोलीस कल्याण विभाग नांदेड.